# जनसंपर्क अधिकारी

**मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २६१-२२** **दिनांक २३/०८/२०२२**

## वाहन व जबरी चोरी करणा-या आरोपीतांना अटक करुन एकुण ३,०४,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल जप्त - वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत मुंबई-अहमदाबाद हायवेवर जबरी चोरी व वाहन चोरीच्या गुन्हयाच्या प्रमाणात वाढ होत असल्याने सदर गुन्हयांचे गांभीर्य लक्ष्यात घेऊन वरिष्ठांनी सदर गुन्हे उघडकीस आणण्याच्या दृष्टीने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना सचूना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपी नामे सोनु श्यामलाल मौर्या, वय २० वर्षे, रा. चिचंपाडा, वसई पुर्व यास दिनांक १२/०८/२०२२ रोजी अटक केली. त्याचेकडे केलेल्या चौकशीत त्याने त्याचे साथीदाराचे मदतीने वालीव पोलीस ठाणेचे हद्दीत ३ मोटार सायकल, पेल्हार व नयानगर पोलीस ठाणेचे हद्दीत २ ॲटोरिक्षा चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

तसेच मुंबई-अहमदाबाद हायवेवर जबरी चोरी झालेल्या गुन्हयांचा तपास करीत असताना मिळालेल्या गोपनीय व तांत्रिक माहितीवरुन आरोपी नामे रवि प्रेमसिंग बिडलान, रा.आचोळ डोंगरी, नालासोपारा पुर्व यास दिनांक १८/०८/२०२२ रोजी अटक करुन त्याच्याकडून वालीव पोलीस ठाण्यात दाखल असलेले जबरी चोरीचे ३ गुन्हे उघड करण्यात आले आहेत. सदर दोन्ही आरोपीत यांचेकडुन एकुण वाहन चोरीचे ५ गुन्हे व जबरी चोरीचे ३ गुन्हे असे एकूण ८ गुन्हे उघडकीस आणून त्यांच्याकडून एकुण ३,०४,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे.

**उघडकिस आलेले मोटार वाहन चोरी व जबरी चोरीचे गुन्हे खालीलप्रमाणे-**

| अ.क्र. | उघडकिस आलेले गुन्हे, रजि नंबर व कलम. |
|---|---|
| १. | वालीव पो.स्टे. गु.र.क्र.९०१/२०२० भा.दं.वि.सं. कलम ३७९. |
| २. | वालीव पो.स्टे. गु.र.क्र. १४३५/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३७९. |
| ३. | वालीव पो.स्टे. गु.र.क्र ७७८/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९. |
| ४. | पेल्हार पो.स्टे. गु.र.क्र. ६१४/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ . |
| ५. | नयानगर पो.स्टे. गु.र.क्र. ५६७/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३७९. |
| ६. | वालीव पो.स्टे. गु.र.क्र ५४८/२०२० भा.दं.वि.सं. कलम ३९४,३२३,३४. |
| ७. | वालीव पो.स्टे. गु.र.क्र. ५८५/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३९२,३४१,३४. |
| ८. | वालीव पो.स्टे. गु.र.क्र. २२६/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३९२,३४. |

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट सहाय्यक पोलीस आयुक्त, तुंळीज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. कैलास बर्वे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक वालीव पोलीस ठाणे, श्री. राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, अवारे, पो.अंम.गजानन गरीबे, सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी यांनी पार पाडली आहे.